Downloaded From :http://cbseportal.com/

**Series JBB/C** **SET-4**

कोड नं.
Code No. **8/C**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थी कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

| नोट | NOTE |
|---|---|
| (I) प्रश्न-पत्रिकेत **8** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या. | (I) Please check that this question paper contains **8** printed pages. |
| (II) प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा. | (II) Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate. |
| (III) प्रश्न-पत्रिकेत **10** प्रश्न आहेत; तपासून घ्या. | (III) Please check that this question paper contains **10** questions. |
| (IV) कृपया उत्तर देण्यापूर्वी प्रश्नाचा क्रमांक उत्तर पुस्तिकेत लिहा. | (IV) Please write down the serial number of the question in the answer-book before attempting it. |
| (V) प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये. | (V) 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period. |

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* — *गुण : 80*

*निर्धारित समय : 3 घण्टे* — *अधिकतम अंक : 80*

*Time allowed : 3 hours* — *Maximum Marks : 80*



Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

## SECTION A

**1.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *10*

यश काही आकाशातून टपकून आपल्या पदरात पडत नसतं. यश हे आपण मिळवायचं असतं. यश मिळविण्यासाठी काही प्रेरणा आवश्यक असते. यशस्वी माणसं कुठल्या ना कुठल्या प्रेरणेनं काम करीत असतात. पैसा/वैभव ही कोणाची प्रेरणा असते, तर सत्ता/अधिकार ही काहींची प्रेरणा असते. कुणाला आयुष्यात काही करुन दाखवायचं असतं, स्वत:ला सिद्ध करायचं असतं किंवा इतरांसाठी काही भरीव, मोलाचं योगदान द्यायचं असतं नि ती प्रत्यक्षात साकारण्यासाठी तो धडपडत असतो, कुणाला आव्हानं स्वीकारण्यात पुरुषार्थ वाटत असतो.

प्रत्येक 'माणसा' चं काही स्वप्न असतं, असायलाच हवं. स्वप्नामुळे आयुष्याला हेतू येतो. जगण्याला दिशा मिळते. तुम्ही एखादं स्वप्न निवडता, तेव्हा ते स्वप्नच तुमची 'नियती' ठरवतं. तुमचं स्वप्न किती मोठं, यावर आयुष्यात तुम्ही किती मोठे होणार, हे ठरते.

स्वप्न माणसाला प्रेरणा देतं, सामर्थ्य देतं. स्वप्नाची शक्ती त्याच्या भव्यतेत असते. जेवढं स्वप्न मोठं, तेवढी प्रेरणा मोठी, ताकद मोठी. भव्य स्वप्न एखाद्या शक्तिशाली चुंबकासारखं असतं. त्या स्वप्नानं हवी ती परिस्थिती, हवी ती साधनं, हवी ती माणसं तुमच्याकडे खेचली जातात. तुमच्या स्वप्नानं भारले जाऊन, प्रेरित होऊन अनेक जण स्वेच्छेनं तुमच्या साथीला येतात. स्वप्न पुरेसं मोठं असलं, तरच ते इतरांनाही वाटता येतं. तुमचं स्वप्न हे सर्वाचंच स्वप्न बनून जातं. जमशेदपूर, वालचंदनगर, किर्लोस्करवाडी ही द्रष्ट्या उद्योजकांची-असंख्यांच्या सहभागानं-साकार झालेली मोठी 'स्वप्नं' च आहेत.

स्वप्नचं पाहायचं, तर छोटं कशाला पहायचं ?

कुठल्या तरी मोठ्या स्वप्नानं झपाटलेली, काहीतरी 'वेड' डोक्यात घेतलेली माणसंच आयुष्यात भव्य दिव्य काही करु शकतात. अशी वेडी माणसंच शेवटी शहाणी ठरतात, यशस्वी होतात.

सूचनेनुसार उत्तरे लिहा.

(अ) खालील प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही ***तीन***)

(i) यश मिळविण्यासाठी काही __________ आवश्यक असते.
(मदत/इच्छा/प्रेरणा) *1*

(ii) कुणाला आव्हानं स्वीकारण्यात _________ वाटत असतो.
(मोठेपणा/पराक्रम/पुरुषार्थ) *1*

(iii) 'शक्ती' ह्या शब्दाची जात __________ आहे.
(विशेष नाम/भाववाचक नाम/सामान्य नाम) *1*

(iv) काहीतरी ___________ डोक्यात घेतलेली माणसचं आयुष्यात भव्य दिव्य काही करु शकतात. (कल्पना/वेड/स्वप्न) *1*


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ***तीन*** )

(i) लेखकाच्या मते आपली नियती कोण ठरविते ? *1*

(ii) भव्य स्वप्नाला कशाची उपमा दिलेली आहे ? *1*

(iii) लेखकाने कोणत्या उद्योजकांचा उल्लेख केला आहे ? *1*

(iv) वेडी माणसे कोणाला म्हटले आहे ? *1*

(इ) खालील प्रश्नांची उत्तरे 2 ते 3 वाक्यांत लिहा.

(i) यश मिळविण्यासाठी कोणकोणत्या प्रेरणा असू शकतात ? *2*

(ii) स्वप्नांची शक्ती त्याच्या भव्यतेत असते; असे कां म्हटले आहे ? *2*

**2.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *10*

श्रावण म्हणजे हिरव्या रंगाचे मुक्त प्रदर्शन. आषाढात जोरजोराने पाऊस कोसळू लागला की जे जे बीज धरणीत पडले असेल ते ते उगवून वर येते. कोवळ्या तृणांकुरांनी पृथ्वीचे विशाल अंग झाकून तर जातेच, पण ते उघडेबोडके दगडही, त्यांच्या आसपासच्या डबक्यात पाणी साचले की हिरव्यागर्द शेवाळाची मखमल पांघरून बसतात. उन्हाळयात ढग नसल्यामुळे आकाश उंच उंच जाते, खाली धरणी उघडी पडते. झाडेही पुष्कळशी उघडी असतात. आता पावसाळयात सृष्टीचा उघडेपणा कुठे कुठेही दिसत नाही. पण हिरव्या रंगाची विशाल वस्त्रे एकावर एक लपेटून चराचर उभे असलेले पाहिले की खरोखरच डोळ्यांचे पारणे फिटले असे वाटते. मऊ माती नटली तर नवल नाहीच; पण ही पानथळे आणि ते रुक्ष कठीण काळे फत्तर, यांना मखमलीचे पांघरूण घेताना पाहिले की मोठी मौज वाटते. अथर्ववेदात शेवाळाला गंधर्वाचे दिव्य अन्न असे म्हटले आहे, ज्या जलाशयात माणूस जाऊ शकत नाही तिथेच हे उगवायचे, माणसाला शेवाळाचा काही उपयोग असू नये, त्याचा हातही त्याला लागू नये, असा हा संकेत पूर्वकालीन कवींनी ओळखला म्हणून का त्यांनी शेवाळाला गंधर्वाचे अन्न बनवले ? या अन्नाला पाय लागला की तुम्ही घसरून पडलाच म्हणून समजा. लांबूनच शेवाळाची शोभा पाहायची. किती नाजूक नखरा त्याचा ! श्रावणात खरोखर किती तृणे, वनस्पती उगवतात, त्यांची काही गणती ? पण या शेवाळाच्या गालिच्याची सर काही कुणाला नाही. आपल्या भारतीयांच्या खाद्यांची वर्णने सगळी चवीची. क्वचित आकाराची. भ्रमर, फुलपाखरे फुलांच्या पेल्यातून मध पितात. तथापि मधाचे रूप काही मोठे आकर्षक नाही. पण सृष्टीतल्या सर्व सौंदर्याचा भौतिक आणि फलात्मक आस्वाद घेणाऱ्या त्या सौंदर्यमूर्ती, सौंदर्यभक्त गंधर्वाचा आहारही सुंदर व अप्रतिम असावा यात नवल काय ?

सूचनेनुसार उत्तरे लिहा.

(अ) खालील प्रश्नांच्या उत्तराचा अचूक पर्याय निवडून लिहा. (कोणतेही ***तीन*** )

(i) श्रावण म्हणजे हिरव्या रंगाचे __________ प्रदर्शन. (सुंदर/मुक्त/मोठे) *1*



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

(ii) अथर्ववेदात शेवाळाला __________ दिव्य अन्न असे म्हटले आहे.
(पक्ष्यांचे/गंधर्वाचे/किटकांचे) *1*

(iii) 'मुक्त' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द खालीलपैकी कोणता आहे ?
(मोकळा/बंदिस्त/अमर्यादित) *1*

(iv) फुलपाखरे फुलांच्या पेल्यातून __________ पितात. *1*
(पाणी/मध/दंबबिंदू)

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ***तीन***)

(i) श्रावण महिन्यात दगडांचे रूप कसे बदलते ? *1*

(ii) शेवाळाची शोभा लांबूनच का पहावी लागते ? *1*

(iii) भारतीय खाद्यपदार्थांची वर्णने कशी असतात ? *1*

(iv) गंधर्वाचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ? *1*

(इ) खालील प्रश्नांची उत्तरे 2 ते 3 वाक्यांत लिहा.

(i) लेखिकेने केलेले शेवाळाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा. *2*

(ii) श्रावण महिन्यातील हिरव्या रंगाचे सौंदर्य पाठाआधारे थोडक्यात लिहा. *2*

## SECTION B

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर दिलेल्या मुद्दयांच्या आधारे निबंध लिहा. *8*

(i) माझ्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग — रोजचे जीवन सामान्य — एखादा प्रसंग आयुष्य बदलविणारा — मित्राच्या गावी — सुट्टीवर आलेला सैनिक — त्याने सांगितलेले थरारक युद्ध प्रसंग — त्याच्याबद्दल अभिमान — देशभक्ती.

(ii) मी मराठी भाषा बोलतेय — देश एक — भाषा अनेक — महाराष्ट्र — मराठी भाषा — अस्मिता — अभिमान हवा — आज नाही — परभाषांचे आक्रमण — चांगली साहित्य निर्मिती नाही — वाचत नाही — मोबाईलचा परिणाम — लेखन/वाचन हवे — शासकीय प्रयत्न हवेत.

(iii) मोबाईल सेवा बंद झाली तर — आजचे युग मोबाईलचे — फायदे — जग जवळ आले — वापराचा अतिरेक — तोटे — बंद झाल्यावर सुसंवाद वाढेल — माणसे जवळ येतील — पत्र, फोनला महत्त्व — इतर करमणुकीची साधने — पुस्तकांचा वापर.


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

4. (अ) खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट लिहा व गोष्टीला शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. 7

मुद्दे : घनदाट जंगल — वाघ व त्याचे पिल्लू — पिल्लू बोलत नाही — त्याला शिकविण्यासाठी गाईची नेमणूक — पिलू हंबरतो — वाघ वैतागला — मांजरीची नेमणूक — पिलू अनुकरण — जंगलात शिकारी — त्याला पाहून.

**किंवा**

तुमच्या शाळेतील भारताचा स्वातंत्र्यदिन सोहळा साजरा करण्याची बातमी तयार करा.

(आ) खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर पत्र लिहा. 5

शाळेच्या प्रयोगशाळेसाठीच्या साहित्याची मागणी करणारे पत्र दुकानदारास लिहा.

**किंवा**

तुम्ही मागविलेल्या पुस्तकांपैकी दोन पुस्तके कमी पाठविल्याची तक्रार करणारे पत्र दुकानदारास लिहा.

## SECTION C

5. (अ) सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***चार***) 4

(i) विमानाने उंच भरारी घेतली. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(ii) घरामागे छान बगिचा आहे. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

(iii) गौरी भरभर जेवत होती. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iv) ज्ञानदाने योगाचे शिक्षण घेतले. (विशेषनाम ओळखा)

(v) समर्थने पिकलेला आंबा खाल्ला. (विशेषण ओळखा)

(vi) वा ! वा ! छान चित्र काढलेस. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(आ) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही ***तीन***) 3

(i) मीरा आज गावी गेली. (भविष्यकाळ करा)

(ii) काळ कधी थांबत नाही. (काळ ओळखा)

(iii) नितीन चित्र काढेल. (भूतकाळ करा)

(iv) प्रिया थंड दूध प्याली. (वर्तमानकाळ करा)

(v) गीता सतत मोबाईल पहाते. (काळ ओळखा)


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

(इ) पुढील वाक्ये कंसातील सूचनेनुसार लिहा. (कोणतेही ***तीन***) *3*

(i) मुलांनी वर्गाची सफाई करावी. (आज्ञार्थी वाक्य करा)

(ii) कोणीही नियम मोडू नयेत. (होकारात्मक वाक्य करा)

(iii) परीक्षा कधी आहे हे तुला माहिती नाही. (प्रश्नार्थक वाक्य करा)

(iv) किती हा पसारा घरात ! (विधानार्थी वाक्य करा)

(v) शीला खूप काम करते. (उद्‌गारवाचक वाक्य करा)

(ई) सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) त्याने एकट्याने सर्व काम केले. (प्रयोग ओळखा)

(ii) स्वाती गाडी छान चालवते. (प्रयोग ओळखा)

(iii) मंगला मला गाणे शिकवते. (प्रयोग ओळखा)

(iv) टेकडी चढतानाच उजाडले. (प्रयोग ओळखा)

(उ) लिंग बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) पिता

(ii) वडा

(iii) गोप

(iv) भगवान

(ऊ) वचन बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) कला

(ii) नात

(iii) सासू

(iv) लिंबू

(ए) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) कार्य

(ii) ग्राहक

(iii) पक्षी

(iv) डोळे

(ऐ) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) उदय

(ii) साक्षर

(iii) प्रगती

(iv) वर


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

## SECTION D

**6.** (अ) योग्य पर्याय शोधून उत्तरे लिहा. (कोणतेही ***तीन*** ) *3*

(i) पहाटेची, सकाळची वेळ _________ योग्य असते.
(व्यायामाला, अभ्यासाला, फिरायला जाण्याला)

(ii) मॅडम नेहमी म्हणतात, की थोरांची चरित्रं __________ प्रेरणा देतात म्हणून.
(मुलांना, सामान्यांना, विद्यार्थ्यांना)

(iii) माझ्या बाबतीत तर आई ही माझी केवळ _________ नव्हती, तर माझे सर्वस्व होती. (आदर्श, शिक्षक, आई)

(iv) हल्ली मी वजन आणि _________ या दोन्ही गोष्टींची चिंता करायचे सोडून दिले आहे. (कॅलरीज्, भविष्य, डाएट)

(v) एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन घेऊन मी आता __________ बनू लागलो आहे. (श्रीमंत, शालीन, शीलवंत)

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही ***तीन*** ) *3*

(i) कादंबरीची धाकटी बहीण कोणाला म्हणता येईल ?
(ii) तपोवनातील स्त्रियांचा आनंदाचा आणि चैतन्याचा दिवस कोणता असे ?
(iii) गुरुजी निरंजनला उत्तम नागरिक का म्हणाले ?
(iv) भावे सरांच्या कोणत्या वाक्यामुळे डॉ. माशेलकरांना एकाग्रतेचा मंत्र मिळाला ?
(v) ॲप मधील रेखामावशीच्या पावलांखाली कोणते इंग्रजी शब्द उमटले ?
(vi) अब्दुल तपोवनामध्ये कशासाठी जात असे ?

**7.** 30 ते 40 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही ***दोन*** ) *4*

(i) पंतांचे वजन घटविण्यासाठी त्यांच्या पत्नीने जेवणामध्ये कोणकोणते बदल केले ?
(ii) लेखकाच्या मते पु.ल. नी दिलेल्या शालीचे खरे सार्थक केंव्हा झाले ?
(iii) गुरुजींच्या सहवासामुळे निरंजनचे व्यक्तिमत्व घडत गेले याविषयी तुमचे विचार थोडक्यात लिहा.
(iv) पाठाआधारे कथा या साहित्य प्रकाराची तुम्हाला झालेली ओळख थोडक्यात लिहा.
(v) डॉ. माशेलकरांनी शिक्षणासाठी केलेला संघर्ष तुमच्या शब्दांत थोडक्यात लिहा.

**8.** (अ) योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. (कोणतेही ***दोन*** ) *2*

(i) तैसे योगियासी __________ येणे । जे इहलोकीं जन्म पावणें ।
(पृथ्वीवरी, खालुतें, या जगी)

(ii) दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच _________ शिकलो.
(जगात, शाळेत, जीवनात)

(iii) अशा __________ ज्योतींची तुझ्यामागून राखण (तेजस्वी, असंख्य, दिव्य)

(iv) भुकेलें वत्सरावें । ________ हुंबरत धांवे ।। (हरणी, पाउस, धेनु)


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

(आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ***चार***) 4

(i) या देशात कोणते सुदर्शन फिरते आहे ?

(ii) कवयित्री जवानाच्या शौर्यावरून जीव का ओवाळू शकत नाही ?

(iii) पाण्याच्या गोडीपेक्षा योग्याचे गोडपण श्रेष्ठ कां असते ?

(iv) श्री. नारायण सुर्वे यांची जिंदगी कशामध्ये बरबाद झाली ?

(v) वनामध्ये वणवा लागल्यावर हरिणी का चिंतीत होते ?

(vi) इंदिरा संत यांना डोळे भरून काय पहावेसे वाटते ?

**9.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. 2

(i) नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।

(ii) घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।

(iii) हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले.

**10.** योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. 2

(अ) नोकरीच्या सुरुवातीच्या काळात लेखकाला वरिष्ठांनी कोणतीही मदत दिली नाही कारण __________ .

(i) एकटा माणूस जास्त काम करू शकतो

(ii) स्वत: काम न करताच लोक मागण्या करतात

(iii) लेखकावर वरिष्ठांचा विश्वास नव्हता

(आ) सन 1938 साली __________ येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते.

(i) इंदूर

(ii) मुंबई

(iii) पुणे

**किंवा**

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. 2

(i) ‘शहाणा’ शब्दाच्या मूळ अर्थाशिवाय आणखी कोणता अर्थ रूढ झाला आहे ?

(ii) भारतातील अणुसंशोधनाचा पाया कोणी घातला ?


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE